# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.३१८/२३/अ.क्र.६५९२/२५/०१**

**श्री. नविन रामचंद्र लादे**
२०३, ए विंग, प्रकाशवाडी कामाबाग सह.गृह.संस्था (नियो)
प्रकाशवाडी, सिनेमॅक्स समोर, अंधेरी-कुर्ला रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४००.०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,म.न.पा. मुंबई इमारत,
पहिला मजला, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू) मुंबई – ४०० ०६९.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १६.१०.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर द्वितीय अपिलावर आज दि.१६.१०.२०२५रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक (प्र.) के/पूर्व विभाग, श्रीम. प्रतिभा दि. पाटील उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग अनुपस्थित आहेत.

या अपिला संदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थी श्री. नविन लादे यांनी दाखल केलेल्या दि.२१.०९.२०२२ रोजीच्या जोडपत्रानुसार सन २००० ते २०१० या कालावधीत नगर भूमापन क्र.२६६, प्रकाशवाडी, सिनेमॅक्स समोर, ८२, प्रकाशवाडी अंधेरी (पूर्व)-९३ यांचे नावे नसणारी कार्यालयातील कर निर्धारण व संकलन खाते यांच्याकडे खाते क्र.३६६४/८६ प्रदान करावे, अशी विनंती केली होती. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक के/पूर्व विभाग यांनी अर्जात नमूद केलेले खाते क्र.३६६४/८६ डि डि अंतर्गत कोणतीही मालमत्ता या विभागात करनिर्धारित नसल्याचे दिसून येत नसल्यामुळे मालमत्तेचा लेखा क्रमांक सदर कार्यालयात प्रत्यक्षात उपस्थित राहून संबंधित विभाग निरीक्षकांशी संपर्क साधून हव्या असलेल्या कागदपत्रे दर्शविल्यास सशुल्क प्रदान करण्यात येतील, असे नमूद केलेले आहे.

त्याविरुद्ध अपिलार्थी यांनी प्रथम अपील अर्ज दाखल केला असून माहिती अप्राप्त असल्याचे तसेच दिलेला प्रतिसाद हा योग्य नसल्याचा आक्षेप नोंदवीत प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर दि.०४.०१.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांनी जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांना अचूक सविस्तर उत्तर दिले असून दिलेले उत्तर हे सकारात्मक असून अपिलार्थी यांनी कळविलेले खाते क्रमांक योग्य नसल्याने त्यांना अपेक्षित असणारी माहिती प्रदान करण्यात आली नसल्याचे नमूद केलेले आहे. याविरुद्ध अपिलार्थी यांनी दि.०६.०१.२०२३ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केला असून, अपिलाचे उत्तर मिळाले नसल्याचा आक्षेप नोंदविला आहे. प्रस्तुत प्रथम अपील अर्जावर दि.०४.०१.२०२३ रोजी सुनावणी झाली असून अपील आदेश दि.०९.०१.२०२३ रोजी निर्गमित केला.

प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक के/पूर्व विभाग व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांनी सकारात्मक भूमिका घेतली असून, अपिलार्थी यांनी योग्य खाते क्रमांक कार्यालयास दिल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती देण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली आहे. अपिलार्थी यांना अद्यापही स्वारस्य असल्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक के/पूर्व विभाग व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांनी सुचित केल्याप्रमाणे संबंधित मालमत्तेचे योग्य खाते क्रमांक हे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक के/पूर्व विभाग यांना कळविल्यास त्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेखात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ यातील कलम २(च) प्रमाणे संबंधित खाते क्रमांका संबंधात उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १६.१०.२०२५**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra